# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या खाजगी विकासकांकडील कोटयवधी रुपयांची थकबाकी वसूल करण्याबाबत

**(१) ३५७६ (०३-०६-२०२०) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२०२ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या खाजगी विकासकांकडील थकबाकीची रक्कम १६७ कोटी रुपयांवर गेली असल्याचा अंदाज वर्तविण्यात आल्यानंतर याचा उलगडा होण्यासाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून विशेष मोहिम हाती घेतली असता त्यात ४४ विकासकांकडील थकबाकीची रक्कम १६६ कोटी ९२ लाख रुपये असल्याचे स्पष्ट झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकीदार विकासकापैकी १२ विकासकांविरुध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे मंडळाकडून तक्रार दाखल करण्यात आली असून विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर माहे एप्रिल, २०१६ ते माहे मार्च, २०१९ पर्यंत रक्कम रुपये ८५.११ कोटी व चालू वर्षामध्ये माहे एप्रिल, २०१९ ते ३१ जानेवारी, २०२० दरम्यान रुपये १८.०३ कोटी रक्कम अशी एकूण रुपये १०३.१४ कोटी वसुल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित मंडळाकडून पॅनल वकील यांना कळविण्यात आले होते त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच विकासकाने थकीत रक्कमेचा भरणा न केल्यामुळे म्हाडामार्फत विकासक करीत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पास काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) देण्यात आल्या असून म्हाडा अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करणेस्तव विकासक यांचे बँक खात्यांचा तपशिल व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विकासक यांचे जंगम व स्थावर मालमत्तेबाबतचा तपशिल अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विकासकांकडील उर्वरित थकबाकी विनाविलंब वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१०-०३-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १६/०३/२०२०ते २०/०४/२०२० या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार होती, मात्र कोविड १९ मूळे कार्यवाही करणे शक्य झाले नाही असे मूबंई इमारत दुरूस्ती पुनर्रचना मंडळ यांनी कळवले आहे. तसेच नोव्हेंबर, २०२० अखेर संक्रमण शिबीराच्या भाड्यापोटीची एकूण रक्कम २३०.५७ कोटी थकीत असल्याचे मुंबई इमारत दुरूस्ती पुनर्रचना मंडळ यांनी कळविले आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर नमूद कालावधीस रुपये १०३.१४ कोटी व दिनांक ०१/०१/२०२० ते ३१/१०/२०२० या कालावधीत रुपये १९.४५ लक्ष असे एकूण १२२.२५ कोटीची वसूली २९ विकासकाकडून केली आहे.
(३) विकासकांकडील संक्रमण गाळयापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकील यांना कळविण्यात आले आहे.

यापैकी विकासक मे.एस.डी.कॉर्पोरेशन यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच विकासक मे.वर्धमान डेव्हलपर्स यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालयाकडे दाखल करावयाच्या Recovery Civil Suit चा मसूदा (Draft) विधी विभाग/प्राधिकरण यांचेकडे अभिप्राय तपासणी करीता पाठविण्यात आला आहे.

उर्वरीत विकासक यांचे विरुध्द मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत पॅनल वकील यांचेकडे आवश्यक ते दस्तऐवज पुरविण्यात आले आहेत. परंतु कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामूळे सदरचे काम पूर्ण होऊ शकले नाही.
(४) संक्रमण गाळयांच्या भाड्याची थकबाकी असणाऱ्या विकासकांविरुध्द म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कार्यवाही करण्याकरीता विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्ताबाबतचा तपशिल सादर करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी/ मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांना मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे पत्र जा.क्र.२५६४, २५६५, २५६६, २५६७ व २५६८ दिनांक २९/०९/२०१७ अन्वये व तसेच स्मरणपत्र क्र.२३९३, २३९४, २३९६, २३९७, २३९८ दिनांक १९/०७/२०१८ रोजी माहिती मागविण्यात आली असून ती अद्याप पर्यंत अप्राप्त आहे.

सर्व विकासकांना मूबंई इमारत दुरूस्ती पुनर्रचना मंडळामार्फत थकीत रक्कमेचा भरणा त्वरीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) थकबाकीदार विकासक यांचे विरुध्द मूबंई इमारत दुरूस्ती पुनर्रचना मंडळामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

थकबाकीदार विकासक यांचे ताब्यातील संक्रमण गाळे मंडळाचे ताब्यात घेण्याकरीता विशेष मोहिम अंतर्गत पथक स्थापण करण्यात आले आहे. परंतु कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामूळे सदरची मोहीम राबविणे शक्य झालेले नाही असा मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचा अहवाल आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी करण्याबाबत

**(२) १०५२८ (०६-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी (भा.पो.से. वगळून) यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू प्रस्तावाच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०२३) :** (१), (२) व (३) होय.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरुन पोलिसांना एकूण १२ प्रकारच्या वैद्यकीय तपासणी चाचण्या प्रस्तावित केल्या असून या प्रस्तावाची छाननी करण्याचे काम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने शासन स्तरावरुन सुरु आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २२/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय सेवेत कार्यरत असलेले वय वर्षे ४० ते ५० मधील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना वर्षातून २ वेळा व ज्यांची ५१ वर्ष व त्या पुढील वयोगटातील सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी वैद्यकीय तपासणी अनुज्ञेय आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर घरकूल धारकांना राष्ट्रीयकृत बॅका कर्ज देत नसल्यामूळे घरकूलधारक लाभार्थी वंचित असल्याबाबत

**(३) १५६०० (२८-१२-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुल धारकांना राष्ट्रीयकृत बॅका कर्ज देत नसल्यामूळे घरकुल धारक लाभार्थी वंचित असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत बॅंकाकडून सुलभ कर्ज उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०६-१०-२०२३) :** (१) व (२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मधील घटक क्रमांक २ CLSS ही योजना मार्च, २०२२ पासून बंद करण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत EWS घटकांकरीता उत्पन्न मर्यादा वार्षिक रुपये ३ लक्ष इतकी होती.

त्यामुळे लाभार्थ्यांना जास्त किंमतीच्या सदनिका खरेदी करण्यासाठी बँकाकडून कर्ज मिळत नव्हते. तथापि, उत्पन्न मर्यादा वाढविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे केंद्रशासनाने MMR क्षेत्रात EWS वर्गाकरीता उत्पन्न मर्यादा रुपये ६ लक्ष इतकी केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उपविभागीय अधिकारी, बुलढाणा (जि.बुलढाणा) यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करण्याबाबत

**(४) १६०३५ (२८-१२-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उपविभागीय अधिकारी, बुलढाणा (ता.जि.बुलढाणा) महसूल विभाग यांच्या मनमानी कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मा.मुख्य सचिव व प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे केली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या पत्रामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकारी यांच्याबाबत अनेक तक्रारी करुन, त्याबाबतचे पुरावे देखील सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (३०-०८-२०२३) :** (१), (२) व (३) उप विभागीय अधिकारी, बुलढाणा यांचेसंदर्भात लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीचा अहवाल विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास सादर केला आहे.

प्राप्त अहवालानुसार संबंधित उप विभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी प्रशासकीय अथवा वित्तीय अनियमितता केलेली नसल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायब तहसिलदार हा संवर्ग राज्य संवर्गाऐवजी विभागीय संवर्ग करण्यात आल्याबाबत

**(५) १८०२८ (२५-०३-२०२३) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायब तहसिलदार या संवर्गातील पदांवर महसूल विभागांतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने नियुक्ती करण्यात येत असतानाही सन २००५ पासून सदर संवर्ग राज्य संवर्गाऐवजी विभागीय संवर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय संवर्ग केल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणानुक्रमे ठरलेल्या जेष्ठताक्रमामध्ये बदल होऊन काही सेवाजेष्ठ नायब तहसिलदार यांची सेवाजेष्ठता यादीत सेवा कनिष्ठ दर्शविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नायब तहसिलदार हा संवर्ग राज्य संवर्गाऐवजी विभागीय संवर्ग करण्यात आल्याने सेवाकनिष्ठ दर्शविण्यात आलेल्या नायब तहसिलदारांच्या ज्येष्ठताक्रम निश्चित करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (११-०८-२०२३) :** (१), (२) व (३) नायब तहसिलदार या संवर्गात अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या निम्नस्तरीय संवर्गातून पदोन्नतीने व सरळसेवेने नियुक्ती करण्यात येते. हा संवर्ग सन १९९८ पासून विभागीय संवर्ग आहे.

सदर संवर्ग राज्यस्तरीय करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १०/०५/२०२१ अन्वये निर्णय घेण्यात आला असून दिनांक १३/०४/२०२२ च्या शासन निर्णयान्वये पूरक सूचना निर्गमित केल्या आहे.

उक्त पूरक सूचनांनुसार तहसिलदार या पदावरील पदोन्नतीच्या मर्यादित प्रयोजनास्तव नायब तहसिलदार संवर्गाच्या सेवाज्येष्ठता याद्या राज्यस्तरावर एकत्रित करण्यात येतात. तसेच अन्य सर्व आस्थापनाविषयक बाबी वरील कार्यवाही विभागीय आयुक्त स्तरावरुनच नियंत्रित करण्यात येते.

तसेच विभाग स्तरावरील नायब तहसिलदार संवर्गाच्या सेवाज्येष्ठता याद्या तहसिलदार या पदावरील पदोन्नतीकरीता राज्यस्तरावर एकत्रित करताना आयोगाच्या गुणानुक्रमानुसार नायब तहसिलदार यांना सेवाज्येष्ठता देण्यात आली आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मांडवा (जि.रायगड) बंदरात साचलेल्या गाळामुळे जलवाहतुकीचे नुकसान होत असल्याबाबत

**(६) १८६४३ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवा (जि.रायगड) बंदरात साचलेल्या गाळामुळे प्रवासी जलवाहतूक करणाऱ्या जलवाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांना वेळापत्रक सांभाळणे कठीण जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंदरात साचलेल्या गाळामुळे ओहोटीच्या वेळी पाणी कमी असल्याने बंदरात होड्या येऊ शकत नाही त्यामुळे रो रो सेवेचे नुकसान होत आहे हेही खरे आहे काय,
(३)असल्यास, मांडवा बंदरात १३५ कोटी रुपये खर्च करून बांधलेला ब्रेक वॉटर बंधारा चुकीच्या ठिकाणी बांधल्याने पावसाळयात समुद्राच्या लाटांबरोबर येणारा गाळ या बंधाऱ्यामुळे अडकतो यापासून जलवाहतुकीचे नुकसान होत आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, बंधाऱ्याचा तांत्रिक पध्दतीने अभ्यास करून पर्यायी उपाययोजना राबविल्यास बंदरातील वाहतूक नफ्यात चालेल अन्यथा गाळामुळे वाहतुकीवर परिणाम होऊन दरवर्षी जल वाहतूकदारांना तोटा सहन करावा लागणार आहे हेही खरे आहे काय,
(५)असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (२१-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मांडवा (जि.रायगड) येथील ब्रेक वॉटरचे बांधकाम करण्यासाठी CWPRS पुणे यांचेकडील काटछेद प्राप्त करून घेण्यात आले असून सदरच्या काटछेदानुसारच ब्रेक वॉटरचे काम करण्यात आलेले आहे.
ब्रेकवॉटर बंधारा योग्य ठिकाणी बांधण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील अधिकृत व अपात्र, अनधिकृत भाडेकरू, रहिवाशी यांना पुनर्विकसीत होणाऱ्या संक्रमण शिबीरांमध्ये गाळे वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(७) १८७९० (१९-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील अधिकृत/ अपात्र, अनधिकृत भाडेकरू/ रहिवाशी यांना पुनर्विकसीत होणाऱ्या संक्रमण शिबीरांमध्ये गाळे वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत गृहनिर्माण विभागाने दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयात संक्रमण शिबीरात सद्य:स्थितीत वास्तव्यास असलेल्या रहिवाशांचे गट-अ, गट-ब व गट-क या तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले असून गट-अ मध्ये अंतर्भूत असलेल्या रहिवाशांचे मूळ जागेवरील इमारतीऐवजी संक्रमण शिबीराच्या इमारतीतच पुनर्वसन करून त्यांना गाळे देण्याचे तसेच गट-ब मध्ये अंतर्भूत असलेल्या रहिवाशांचेही संक्रमण शिबीराच्या जागेत पुनर्वसन करताना त्यांच्याकडून संक्रमण शिबीरातील सदनिकेच्या बांधकामाचा खर्च वसूल करण्याची बाब नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संक्रमण शिबीरात सद्य:स्थितीत वास्तव्यास असलेले मूळ सदनिकाधारक यांना त्यांच्या मूळ जागेवरील इमारतीमधील सदनिकेचा ताबा सोडण्यास प्रवृत्त करण्याची तसेच उपरोक्त शासन निर्णयातील गट-ब मधील रहिवाशांनी मूळ सदनिकाधारकांस सदनिकेची तत्कालीन बाजारभावाप्रमाणे किंमत अदा केलेली असताना त्यांचेकडून पुन्हा नव्याने सदनिकेच्या बांधकामाची रक्कम वसूल करून त्यांना मूळ इमारतीऐवजी संक्रमण शिबीरातील सदनिका देण्याची बाब प्रस्तावित करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त शासन निर्णयातील गट-अ मधील रहिवासी हे मूळ इमारतीमधील सदनिकांचे स्वत: मालक असल्याने तसेच गट-ब मधील रहिवाशी यांनी मूळ मालकास तत्कालीन बाजार मुल्याप्रमाणे सदनिकेची किंमत अदा केलेली असून त्याबाबतची मुखत्यारपत्र /तत्सम प्राधिकार पत्र त्यांचेकडे असल्याने त्यांना त्यांच्या नावे मूळ इमारतीच्या जागेवर पुनर्विकसित होणाऱ्या इमारतीत सदनिका वाटप करणे क्रमप्राप्त असून या रहिवाशांकडून गेल्या कित्येक वर्षांपासून तशी मागणी म्हाडा व राज्य शासनाकडे करण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संक्रमण शिबीरात सद्य:स्थितीत वास्तव्यास असलेल्या गट-अ व गट-ब मधील रहिवाशांना मूळ जागेवरील इमारतीमध्ये नि:शुल्क सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक १३/०९/२०१९ अन्वये गट "अ" मधील रहिवाशी मूळ पात्र भाडेकरु असल्याने सदर रहिवाशी तो सध्या असलेल्या संक्रमण शिबिराच्या ठिकाणी पुनर्विकास होत असल्यास त्या इमारतीमध्ये नि:शुल्क पुनर्वसन करण्यात येईल. तथापि, त्या रहिवाश्यांनी त्यांचे मूळ उपकरप्राप्त इमारतीमधील गाळयाचा हक्क मंडळाकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे.

गट "ब" मधील रहिवाशी यांनी मूळ गाळेधारकांना काही आर्थिक मोबदला देऊन मुखत्यार पत्र (Power of Attorney) किंवा तत्सम प्राधिकारपत्राव्दारे अनियमित/बेकायदेशीर व्यवहार केला असल्याने, अशा रहिवाश्यांना गट "अ" मधील रहिवाश्यांचे निकष लावून निशु:ल्क पुनर्वसन करणे शक्य नाही.

अशा रहिवाश्यांनी केलेला व्यवहार जरी बेकायदेशीर असला, तरी सदर व्यवहारामध्ये त्यांनी काही आर्थिक रक्कम दिली असल्याने, सहानभुतीच्या दृष्टीकोनातून या प्रवर्गातील गाळेधारकांकडून ते सध्या राहत असलेल्या संक्रमण शिबिरातील गाळयाच्या क्षेत्रफळा इतक्या सदनिकेचा बांधकाम खर्चाची रक्कम (Construction cost) अधिक सदरहू पुनर्वसित गाळयास पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधा (Infrastructure cost) त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १३/०९/२०१९ च्या शासन निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपिठ मुंबई येथे जनहित याचिका (लॉ) क्र.१/२०२० दाखल करण्यात आलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २०/१०/२०२० च्या आदेशान्वये पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे.

सदर आदेशामध्ये वर्गवारी “अ” मधील मूळ रहिवाशांचा समावेश असल्याने, मा.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशामध्ये सुधारणा करण्याकरीता मा.उच्च न्यायालयात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत Interim Application दाखल केले आहे.

---

## राज्यात महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलच्या निवडणूका घेणेबाबत

**(८) १९०५७ (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑगस्ट,२०२३ च्या पहिल्या आठवड्यामध्ये महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलची मुदत संपल्यानंतरही शासनाने निवडणुका लावलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे डॉक्टरांच्या नोंदणीसह रुग्ण हक्काशी संबंधित अनेक बाबी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन सदर निवडणूका तातडीने घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७ मधील निवडणूक नियमांमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एसआरए योजनांमधील सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांना अडीच लाखांमध्ये घर देण्यांच्या प्रस्तावाबाबत

**(९) १९११५ (३०-०६-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन अधिनियम १९७१ मधील तरतूदीनुसार शासनाने राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील दिनांक १ जानेवारी २००० च्या संरक्षणपात्र झोपडीधारकांना मोफत घर देण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच दिनांक १ जानेवारी २००० नंतरच्या आणि १ जानेवारी २०११ पूर्वीच्या झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासननिर्णयाला अनुलक्षून एसआरए योजनेत सशुल्क पुनर्वसनाला पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांना पात्र करून त्यांच्याकडून वसूल करावयाच्या सदनिकेची किंमत निश्चित करताना प्रकल्पातील पुनर्वसन घटकांच्या एकूण बांधकामाचा खर्च, प्रकल्पातील प्रस्तावित केलेल्या अत्यावश्यक

व अन्य पायाभूत सुविधांच्या विकासासाठी येणारा खर्च,एसआरएचा स्थिर दराचा इतर प्रशासकीय खर्च या तीन निकषांचा विचार करून एसआरएचे मुख्य अधिकारी किंमत जाहीर करतील असे आदेश गृहनिर्माण विभागाने दिनांक ७ सप्टेंबर २०१८ रोजी परिपत्रकान्वाये दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गृहनिर्माण विभागाने दिलेल्या आदेशानुसार एसआरए प्राधिकरणाने सशुल्क झोपडीधारकांना अडीच लाखांत घर देण्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एसआरएने प्राधिकरणाने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एसआरएने प्राधिकरणाने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावावर मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.अतुल सावे (१४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सशुल्क सदनिकांचे शुल्क निश्चित करण्याच्या अनुषंगाने दिनांक ०९ मार्च, २०२१ रोजी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या शिफारशी तसेच मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या निर्देशानुसार सशुल्क सदनिकेचे शुल्क सरसकट रुपये २.५ लाख इतके निश्चित केले असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २५/०५/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील प्रलंबित वन हक्क दावे निकाली काढणे बाबत

**(१०) १९५९९ (०८-०८-२०२३) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील मेवासी व नंदुरबार अशी दोन वन विभाग कार्यरत असून त्यापैकी मेवासी वन विभगात ६३००० हेक्टर वनक्षेत्र व नंदुरबार वन विभागात १७०००० हेक्टर वन क्षेत्र अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेवासी वन विभागात सुमारे ११००० हेक्टर तर नंदुरबार वन विभागात २९००० हेक्टर वनदावे मंजूर असून दोन्ही वन विभाग मिळून नंदुरबार जिल्ह्यात सुमारे १०००० वन दावे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हास्तरीय वनहक्क समिती वन दावे निकाली काढतेवेळी दुजाभाव करीत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हास्तरीय वनहक्क समितीने प्रलंबित ठेवलेले वन दावे निकाली काढणे करीता शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (३०-०८-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

नंदुरबार जिल्ह्यात प्राप्त दाव्यांपैकी, एकूण २६,८८७ दावे मंजूर करण्यात आले असून सद्य:स्थितीत १०,४७३ दावे प्रलंबित आहे.

(३) व (४) बाबत जिल्हास्तरिय समितीमार्फत संबंधितांना नोटीसा बजावून त्याची सुनावणी घेण्यात येते. सुनावणीवेळी दावेदारांना स्थानिक भाषेत किंवा त्यांनी सोबत आणलेल्या व्यक्तीमार्फत संबंधितांच्या शंकेचे निरासन होईपर्यंत समजविण्यात येते.

वन हक्क अधिनियम २००६व २००८ व सुधारित नियम २०१२ च्या कलम ३(१) मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार सबळ पुरावे असल्यास दावा मान्य केला जातो. कोणत्याही प्रकारे अर्जदारांमध्ये दुजाभाव करण्यात येत नाही.

तसेच प्रलंबित दावे जलदगतीने निपटारा होण्यासाठी जिल्हास्तरीय वन हक्क समितीची बैठक दर मंगळवारी आयोजित करण्यात येते.

(४) अशी बाब नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील भिलाला, पावरा, राठीया या जमातीच्या लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(११) १९८७६ (०४-०८-२०२३) श्री.किरण सरनाईक : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १०२६३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील भिलाला,पावरा,राठीया या जमातीच्या लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नसल्याची बाब माहे मे २०२३ च्या शेवटच्या हप्त्यामध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय.

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार भिलाला,पावरा,राठीया (जि.बुलढाणा) या जमातीच्या लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०४-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) “महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व सदर अधिनियम अंतर्गत पारीत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३”, दिनांक ०४/०६/२००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी सहाय्यकांची विभागांतर्गत कृषी पर्यवेक्षकपदी (सुपरव्हायझर) पदस्थापना करताना पैशाची मागणी करण्यात येत असल्याबाबत

**(१२) २००१० (०८-०८-२०२३) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी सहाय्यकांची ७५० पदे असून त्यासाठी ४०० उमेदवार विभागांतर्गत सहाय्यकातून पर्यवेक्षक पदोन्नतीच्या परिक्षेत उत्तीर्ण झाले असल्याचे असून विभागांतर्गत कृषी पर्यवेक्षकपदी (सुपरव्हायझर) पदस्थापना करण्यासाठी उत्तीर्ण झालेल्या कृषी सहाय्यकांना विभागीय कृषी सह संचालक कार्यालयातून दूरध्वनीद्वारे ५० हजार ते १ लाख रुपयांची मागणी केली असून माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार पात्र कृषी सहाय्यकांकडून विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील पैशाची मागणी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.धनंजय मुंडे (०५-०९-२०२३) :** (१) व (२) कृषी पर्यवेक्षक संवर्गाकरीता सुधारीत सेवा प्रवेश नियम दिनांक २९/०१/२०१८ अन्वये अधिसूचित करण्यात आले असून त्यानुसार कृषी पर्यवेक्षकांची ३० टक्के पदे मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तद्नुषंगाने मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यातील रिक्त पदे कृषी सहाय्यक संवर्गातून मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्याकरीता एकूण ७५९ पदांची जाहिरात दिनांक १३/०१/२०२३ रोजी सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांचेस्तरावर प्रसिध्द करण्यात आली.

तसेच सदरची परीक्षा दिनांक ०३/०४/२०२३ रोजी सर्व विभागस्तरावर पार पडली आहे. सदर परीक्षेमध्ये उत्तीर्ण उमेदवारांची आय.बी.पी.एस. कंपनीकडून प्राप्त झालेली सर्वसाधारण गुणवत्ता यादी सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांचेस्तरावरुन कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे तद्नंतर कृषी आयुक्तालयाच्या दिनांक २७/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर निकालाच्या आधारे पुढील कार्यवाहीबाबत कालबध्द कार्यक्रम आखून देण्यात आला. त्यानुसार विभागीय कृषी सहसंचालक यांचे स्तरावरुन जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेकडून सदर निकालाच्या अनुषंगाने तात्पुरत्या निवड यादीमध्ये अंतर्भुत करण्यात आलेल्या उमेदवारांची कागदपत्र तपासणी / पडताळणी करण्यात आली. त्यानुषंगाने सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांनी त्यांचेस्तरावरून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीतील विज्ञापित पदसंख्येनुसार व कागदपत्र पडताळणीअंती कृषी पर्यवेक्षक पदावरील पदस्थापनेचे नियुक्ती आदेश निर्गमित केले आहेत. आयुक्त(कृषी) यांचे कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार राज्यातील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातून कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांनी मर्यादित विभागीय परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या कृषी पर्यवेक्षक पदावरील कोणत्याही उमेदवाराकडे फोन करून पैशाची मागणी केलेली नाही. याबाबत उमेदवारांकडून कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार राज्यातील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दानापूर ते पुणे रेल्वे एक्सप्रेसमधून मुलांची अवैधरित्या होणारी वाहतूक करणाऱ्या संबंधित व्यक्तींविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत

**(१३) २००३० (०७-०७-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व सांगली येथील मदरशांमध्ये शिक्षण देण्यासाठी नेत असल्याचे सांगून दानापूर ते पुणे रेल्वे एक्सप्रेसमधून मुलांची अवैधरित्या होणारी वाहतूक मनमाड व भुसावळ पोलिसांनी उघडकीस आणून ५९ मुलांची सूटका केल्याची बाब दिनांक ३१ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथील रुईकर कॉलनी भागात काही नागरिकांना एका ट्रकमध्ये ६३ अल्पवयीन मुले आढळून आली या मुलांची व त्यासोबत असणाऱ्या ५ व्यक्तींची पोलिसांनी चौकशी केली असून पोलिसांनी ५ व्यक्तींविरुध्द मानवी तस्करीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मानवी तस्करीचा गुन्हा दाखल करुन संबंधित व्यक्तींविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०२३) :** (१) दिनांक ३० मे, २०२३ रोजी दानापूर - पुणे एक्सप्रेस रेल्वेतून प्रवास करणाऱ्या ३० अल्पवयीन मुलांची मनमाड रेल्वे स्टेशन येथून सुटका करण्यात येऊन ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी रेल्वे पोलीस स्टेशन, मनमाड येथे गु. र. क्र. ४०८/२०२३, कलम ३७०, ३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच भुसावळ रेल्वे स्टेशन येथून याच रेल्वे मधून प्रवास करणाऱ्या २९ अल्पवयीन मुलांची सुटका करण्यात आली असून गु. र. क्र. ५७७/२०२३, कलम ३७० भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) शाहुपुरी पोलीस ठाणे कोल्हापूर येथे दिनांक १२/०६/२०२३ रोजी गु. र. क्र. ६११/२०२३, बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ७५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ३ आरोपींविरुध्द सीआरपीसी १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. बाल कल्याण समितीच्या आदेशाने सदर गुन्ह्यातील ६९ बालकांची ग्रामीण रुग्णालय, कागल येथे वैद्यकीय तपासणी करून बालकांना सुरक्षितरित्या बाल गृहात दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निळवंडे कालव्यामधून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(१४) २०४५१ (११-०७-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील निळवंडे धरणाचे बांधकाम पूर्ण होवून तब्बल ५१ वर्षांनी धरणातून कालव्यात पाणी सोडण्याची चाचणी करण्यात आली असताना डाव्या कालव्यातून गळती होत असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निळवंडे प्रकल्पाला दिनांक १४ जुलै, १९७० मध्ये मान्यता देताना प्रकल्पाचा एकूण खर्च ७ कोटी ९३ लाख इतका असताना राजकीय संघर्ष, ठेकेदार व अधिकारी यांच्या आडमुठे धोरणामुळे प्रकल्पाची किंमत ५ हजार १७७ कोटी ३४ लाख रुपये झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डाव्या कालव्यामधुन होणाऱ्या गळतीमुळे आजुबाजुच्या शेतीचे नुकसान होत असल्यामुळे करण्यात आलेल्या कामाची चौकशी करण्याची तसेच कालव्या लगतच्या ग्रामपंचायती कडून ना-हरकत दाखल्याशिवाय पाणी सोडण्यात येवू नये अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्यातुन होत असलेल्या गळतीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डाव्या कालव्याचे करण्यात आलेल्या बांधकामाबाबत संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची दिनांक ३१/०५/२०२३ रोजी प्रथमत: पाणी सोडून चाचणी पूर्ण करण्यात आली आहे. सदर चाचणी दरम्यान डावा कालवा कि.मी. २ ते २८ मधील काही भागामध्ये पाणी गळती निदर्शनास आली आहे. सदर ठिकाणी कालवा हा बहुतांश डोंगर उतारातुन जात असल्याने त्याठिकाणी खडकाळ व Jointed भुस्तर आहे. सदर पाझर हा प्रामुख्याने भौगोलिक परिस्थितीमुळे असून सदरहू Joints मधुन पाझर होत असल्याचे कालव्याच्या प्रथम पाणी चाचणी दरम्यान निदर्शनास आले आहे. कि.मी. २ ते २८ मधील निविदा कामे प्रगतीपथावर असून सदर निविदा अंतर्गत आवश्यक दुरुस्त्या संबंधित अभिकरणामार्फत करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(२) हे खरे नाही.

उर्ध्व प्रवरा (निळवंडे) प्रकल्पास दिनांक १४/०७/१९७० रोजी रुपये ७.९३ कोटी इतकी मूळ प्रशासकीय मान्यता आहे.

प्रकल्पाच्या मूळ धरण स्थळामध्ये झालेला बदल, प्रकल्पग्रस्त शेतकरी यांच्या विविध मागण्यांमुळे प्रकल्पाच्या कामास असलेला विरोध, जमिनीचे भूसंपादनाबाबत अडचणी व त्यासंदर्भात प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनामुळे प्रकल्पाचे काम वेळोवेळी बंद असणे, वेळोवळी प्रकल्पाकरीता निधीच्या अनुपलब्धता इत्यादी कारणांमुळे सदर प्रकल्पाच्या कामास विलंब झालेला आहे. सदरहू विलंबामुळे झालेली भाववाढ तसेच प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये झालेल्या बदलांमुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ झालेली आहे.

उर्ध्व प्रवरा (निळवंडे) प्रकल्पास शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०२३ अन्वये रुपये ५१७७.३८ कोटी रक्कमेची पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या भरती संधर्भात विभागीय चौकशीचे दिलेले आदेश

**(१५) २०६३६ (०८-०८-२०२३) श्री.सुरेश धस : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ५७२४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या वित्त विभागांतर्गत सन २०१४ मध्ये कनिष्ठ लेखाधिकारी हे पद बिंदू नामावली डावलून भरल्याने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १४/०२/२०१८, १४/०३/२०१९, दिनांक ०७/०६/२०१९, दिनांक १५/०७/२०१९, दिनांक १०/१२/२०१९,दिनांक २५/०९/२०२०, दिनांक ०२/१२/२०२०, दिनांक २७/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आदेश देऊनही सदर प्रकरणांतील संबंधित २१ दोषी अधिकाऱ्यांविरुध्द व कर्मचाऱ्यांविरुध्द दोषारोप १ ते ४ सादर करण्यास जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी जाणीवपूर्वक दिरंगाई करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,धाराशीव लाईव्हने वारंवार आवाज उठवलेला असून याप्रकरणी दिनांक २२ जून, २०२३ रोजी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास,कनिष्ठ लेखाधिकारी हे बिंदुनामावलीप्रमाणे पदभरती न करता जाणीवपुर्वक इ.मा.व.चे आरक्षण डावलुन भ.ज.ब.मधुन भरणाऱ्या जबाबदार दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करुन दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (१६-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १४/०३/२०१९, दिनांक १५/०७/२०१९ व दिनांक ०२/१२/२०२० नुसार सदर प्रकरणी झालेली अनियमितता विचारात घेता तत्कालीन संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासाठी दोषारोप प्रस्ताव जोडपत्र १ ते ४ सह सादर करणेबाबत कळविण्यात आल्यानुसार जिल्हा परिषद कार्यालयाकडून सन २०१४ पदभरती प्रक्रियेतील तत्कालीन सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ४/०१/२०२१ व दिनांक १९/०४/२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यानुषंगाने तत्कालीन सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे लेखी खुलासे प्राप्त झाले आहेत. सदर खुलासे जि.प., उस्मानाबाद यांचेकडून अवलोकनार्थ तथा पुनर्विचारार्थ दिनांक १८/०१/२०२३ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर करण्यात आले होते. सन २०१४ च्या भरती प्रक्रियेत जि.प., उस्मानाबाद येथील कनिष्ठ लेखाधिकारी हे पद बिंदु नामावलीप्रमाणे भरण्यात आले नसल्याप्रकरणी मा.व.क., विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पुन:श्च अभिप्राय घेतले असता भरती प्रक्रियेकरीता जाहिरात देतांना इ.मा.व. मधुन पद भरणे अपेक्षित असल्याचे कळविले आहे, त्यामुळे सदर भरती प्रक्रियेत

सकृतदर्शनी अनियमितता झाली असल्याचे उप आयुक्त (आस्थापना), औरंगाबाद विभाग यांनी नमूद केले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाने दिनांक ७/०७/२०२३ च्या पत्रान्वये सदर भरती प्रक्रियेत सकृतदर्शनी अनियमितता झाल्याचे दिसून येत असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर दोषारोपपत्र १ ते ४ ठेवणेसाठी अनुषंगिक अभिलेखे घेऊन उपस्थित राहणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार सुधारीत दोषारोप जोडपत्र १ ते ४ जि.प., उस्मानाबाद कार्यालयाने दिनांक ४/०९/२०२३ नुसार उप आयुक्त (आस्थापना), औरंगाबाद यांना सादर केले आहे.

(२) श्री.बाळासाहेब सुभेदार, सत्यशोधक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी याप्रकरणी दिनांक २२ जून, २०२३ अन्वये अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांना निवेदन दिले आहे.

(३) विभागीय आयुक्त कार्यालयाने दिनांक ०७/०७/२०२३ च्या पत्रान्वये सदर भरती प्रक्रियेत सकृतदर्शनी अनियमितता झाल्याचे दिसून येत असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर दोषारोपपत्र १ ते ४ ठेवणेसाठी अनुषंगिक अभिलेखे घेऊन उपस्थित राहणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार सुधारीत दोषारोप जोडपत्र १ ते ४ जि.प., उस्मानाबाद कार्यालयाने दिनांक ०४/०९/२०२३ नुसार उप आयुक्त (आस्थापना), औरंगाबाद यांना सादर केले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरामध्ये ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डांन्सबार सुरु असल्याबाबत

**(१६) २०६८७ (११-०७-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडदेव,मुंबई येथील इंडियांना बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डांन्सबार सुरु असल्याची घटना माहे जुन, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून, शहरातील विविध भागात ऑर्केस्ट्राच्या नावाखाली सुरु असलेल्या डांन्सबारकडे पोलीस प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डांन्सबार सुरु करणाऱ्या बार मालकांविरुध्द कारवाई करुन त्यांना देण्यात आलेले परवाने रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सदर आस्थापनेविरूध्द ताडदेव पोलीस ठाणे येथे दिनांक ३०/०५/२०२३ रोजी गु.र.क्र. १५८/२३, कलम १८८, ३४ भा.द.वि., सह कलम ३, ८(१)(२) महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ अन्वये आणि दिनांक १०/०६/२०२३ रोजी गु.र.क्र. १७०/२०२३, कलम १८८, २८३, भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) मुंबईतील "ऑर्केस्ट्रा" हॉटेल आस्थापनांवर स्थानिक पोलीस ठाणे व समाजसेवा शाखा यांनी वेळोवेळी छापा कारवाया करुन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सन २०२१ ते जून, २०२३ अखेर ऑर्केस्ट्रा हॉटेल आस्थापनांवर खालीलप्रमाणे कारवाया करण्यात आल्या आहेत.

| वर्ष | ऑर्केस्ट्रा बार वर दाखल गुन्हे |
|---|---|
| सन २०२१ | ३८ |
| सन २०२२ | ८४ |
| जून, २०२३ अखेर | २४० |

तसेच हॉटेल आस्थापनांवरील छापा कारवाईच्या अनुषंगाने प्राप्त कसुरी अहवालानुसार संबंधित आस्थापनाधारकांना प्रशासकीय कार्यवाही अंतर्गत कारणे दाखवा नोटीस देऊन सुनावणी घेण्यात येते. आस्थापनाधारकांचे म्हणणे ऐकून व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे या सर्व बाबी विचारात घेऊन परवाना रद्द / निलंबनाची कार्यवाही करण्यात येते.

| वर्ष | ऑर्केस्ट्रा बार संख्या आस्थापना / परवाना | | सक्त ताकीद | परवाना निलंबित | कायमस्वरूपी रद्द |
|---|---|---|---|---|---|
| २०२१ | २५६ | ३५५ | ०४ | २३ | ०३ |
| २०२२ | ३३३ | ४४५ | ०३ | ७२ | ० |
| २०२३ माहे जून अखेर | ३३१ | ४४६ | ०७ | ७३ | ०१ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी (ता.परतूर, जि.जालना) येथील अल्पवयीन मुली पळवून नेण्याच्या टोळीमधील सदस्यांनी फसवून अल्पवयीन मुलीस पळवून नेल्याबाबत

**(१७) २०६९७ (२४-०७-२०२३) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (ता.परतूर, जि.जालना) येथील एका अल्पवयीन मुलीस फसवून पळवून नेल्याबाबतची तक्रार परभणी येथील स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी मा.मुख्यमंत्री (मध्यवर्ती टपाल केंद्र मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई) यांच्याकडे दिनांक २१/०६/२०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पवयीन मुलींची फसवणुक करणाऱ्या टोळीला सहकार्य करणाऱ्या स्थानिक पोलीस यांच्यावर कारवाई करुन संबंधित अल्पवयीन मुलीस पालकांच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०२३) :** (१) मा.आ. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स. यांचे दिनांक २१/०६/२०२३ रोजीचे निवेदन मा.मुख्यमंत्री (मध्यवर्ती टपाल केंद्र मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई) यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्रकरणी पिडीत मुलीच्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवरून आष्टी पोलीस स्टेशन येथे मिसींग क्र. ०४/२०२३ प्रमाणे प्रकरण नोंदविण्यात आले होते. प्राथमिक तपासात पिडीत अल्पवयीन मुलीस आरोपीने फूस लावून पळवून नेल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन आष्टी येथे गु. र. नं. ६०/२०२३, कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात "एक शेतकरी एक रोहित्र" योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(१८) २०८१६ (०७-०७-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "एक शेतकरी एक रोहित्र" योजनेंतर्गत शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतंत्र रोहित्र बसविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून उक्त योजनेंतर्गत वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात गत दोन महिन्यांत ८०० मंजूर रोहित्रांपैकी फक्त ७५ रोहित्र बसविण्यात आले असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयाकडे तक्रारी करुनही स्वतंत्र रोहित्र बसवून देण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने शेतकऱ्यांना "एक शेतकरी एक रोहित्र" योजनेंतर्गत स्वतंत्र रोहित्र देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन सदरहू योजनेंतर्गत तात्काळ स्वतंत्र रोहित्र बसविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

कृषीपंप वीज जोडणी धोरण -२०२० अंतर्गत उच्चदाब / लघुदाब वीज वाहिनीपासून २०१ ते ६०० मीटर अंतर असणाऱ्या दिनांक ०१/०४/२०१८ पासून पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप वीज धारकांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे १६/२५ केव्हीए क्षमतेच्या रोहित्रावर जास्तीत जास्त ०२ कृषी पंपाना वीज जोडणी देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत वैजापूर तालुक्यामधील मार्च २०२३ पर्यंत १४३३ कृषीपंप वीज जोडणी धारक पैसे भरुन प्रलंबित आहेत. त्यापैकी प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार गत दोन महिन्यांमध्ये ४५७ कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आली असून, १६ केव्हीए क्षमतेचे ४५७ रोहित्र बसविण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.

वैजापूर तालुक्यातील १४०३ प्रलंबित कृषीपंप वीज जोडणी करीता कार्यादेश देण्यात आले असून, ४५७ रोहित्र बसविण्यात आले आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पहिल्या किंवा पोटमाळ्यावरील ‘फोटोपास’धारक झोपडीधारकांना पुनर्वसन योजनेतून मोफत घर योजनेचा लाभ देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत

**(१९) २०८२३ (११-०७-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पहिल्या किंवा पोटमाळ्यावरील ‘फोटोपास’धारक झोपडीधारकांना पुनर्वसन योजनेतून मोफत घर योजनेचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने राज्य शासनाकडे माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा तत्पूर्वी मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने पहिल्या किंवा पोटमाळ्यावरील ‘फोटोपास’ धारक झोपडीधारकांना पुनर्वसन योजनेतून मोफत घर योजनेचा लाभ देण्याबाबतच्या प्रस्ताावर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) तथापि, मुंबईतील दिनांक ०१/०१/१९७६ पूर्वीच्या व सध्या अस्तित्वात असलेल्या खाजगी जमिनींवरील अधिकृत जुन्या चाळींच्या पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाश्यांना पुनर्वसन योजनेचा लाभ देण्याचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून शासनाकडे दिनांक २३/१२/२०२२ व दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनाची तत्वत: मान्यता प्राप्त झाली असून यानुषंगाने पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लाभ शहरी भागातील आदिवासींना होत नसल्याबाबत

**(२०) २०८५७ (११-०७-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शबरी आदिवासी घरकूल योजनेंतर्गत २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात १० लाख ७० हजार ९९० घरे बांधण्याचे धोरण निश्चित केले असून नागपूर जिल्ह्यामध्ये ५ हजार ५७० घरे बांधण्यात येणार असताना शहरी भागातील आदिवासींना या योजनाचा कोणताही लाभ देण्यात येत नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रामीण भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये १.२० लाख मर्यादित केल्याने शहरी भागात झोपडपट्टी मध्ये तसेच मातीच्या घरात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांना शबरी आदिवासी घरकूल योजनेंतर्गत मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे सदर अट शिथिल करुन शहरी भागातील आदिवासींना सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने शासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विषयाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहरी भागात झोपडपट्टी मध्ये तसेच मातीच्या घरात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी शबरी आदिवासी घरकूल योजनेंतर्गत घरे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१४-०७-२०२३)** : (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ०२ जून, २०२३ अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील ग्रामीण भागाकरीता १,०७,०९९ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले असून नागपूर जिल्ह्यासाठी ५००० घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लाभ शहरी भागात देण्याच्या अनुषंगाने निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने त्यांच्या दिनांक ०५/०४/२०२३ च्या निवेदनान्वये शासनाकडे शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लाभ शहरी भागात लागू करण्याबाबत मागणी केलेली आहे.

(३) शहरी भागात शबरी आदिवासी घरकूल योजनेची अमंलबजावणी संबंधित नगरपालिका /महानगर-पालिकामार्फत करण्याच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
आदिवासी विकास विभागाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही नगरविकास विभागाकडून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.